WHAT??

॥ श्री घाटजाई प्रसन्न ॥

☎: (०२१६८)२४००२०

# पांचगणी गिरिस्थान नगरपरिषद शिक्षण मंडळ शाळा नं. १,

पांचगणी, ता. महाबळेश्वर, जि. सातारा.

॥ सा विद्या विमुक्तये ॥ ॥ तमसो मा ज्योतिर्गमय ॥

जा.नं. दिनांक:- २०/०१/२०१२

आ. नं. 575

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव
मुकुल माधव फाऊंडेशन
५ हरमनी सोसायटी,
गणेश खिंड रोड, कस्तुर कुंज समोर,
पुणे- ४११००७

महोदय,

आपण आमचे नगरपरिषद शाळा क्र. १ व २ पांचगणी मधील मुलामुलींना ४५७ स्वेटर पुरविलेबद्दल प्रथम आम्ही शाळांच्या व मुलांच्या वतीने आपले शतशः आभार मानतो. आमचे शाळेमध्ये सध्या इयत्ता पहिली ते सातवी पर्यंत वर्ग अस्तित्वात असून पांचगणीमध्ये त्यानंतर पुढील शिक्षणासाठी दोन शासकीय विद्यालये उपलब्ध असल्याने इयत्ता आठवीचा वर्ग सुरु करण्याची आवश्यकता नाही. मात्र विद्यार्थ्यांना आजच्या युगाला सुसंगत असे शिक्षण देण्यासाठी पहिलीपासून सेमी इंग्रजी अध्यापन पद्धतीचा अभ्यासक्रम सुरु केला, तर मुलांचा शैक्षणिक दर्जा निश्चित सुधारेल. त्यासाठी इयत्ता पहिलीपासून सेमी इंग्रजी सुरु करण्यासाठी आपल्या संस्थेमार्फत आमचे प्रत्येक शाळेला इंग्रजी प्रशिक्षित दोन शिक्षक पुरवले तर आम्हाला आमच्या शाळेत सेमी इंग्रजी अभ्यासक्रम सुरु करता येईल व त्यामुळे मुलांचा शैक्षणिक दर्जा निश्चितच सुधारेल. त्यासाठी आपले मार्फत आमचे प्रत्येक शाळेला

☎: (०२१६८)२४००२०

|| श्री घाटजाई प्रसन्न ||

**पांचगणी गिरिस्थान नगरपरिषद शिक्षण मंडळ शाळा नं. १,**

**पांचगणी, ता. महाबळेश्वर, जि. सातारा.**

|| सा विद्या विमुक्तये ||

|| तमसो मा ज्योतिर्गमय ||

जा.नं. दिनांक:- २० / ०७ / २०१२

दोन असे चार इंग्रजी प्रशिक्षित शिक्षक नेमावेत. त्या शिक्षकांसाठी दरमहा रू. ६,००० प्रमाणे एकूण २४,००० रू. असे अनुदान आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे आमचे दोन्ही शाळांसाठी स्वतंत्र अशी विज्ञान प्रयोगशाळा साहित्यासह उपलब्ध करून द्यावी. सदर इमारत बांधकामासाठी अंदाजे रू. एक लाख व साहित्यासाठी रू. पन्नास हजार आवश्यक आहेत. सदरची प्रयोगशाळा उपलब्ध करून दिलेस विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणेस मदत होईल.

पांचगणीमध्ये मराठी माध्यमाच्या पूर्व प्राथमिक शिक्षणाची कोणतीही सुविधा उपलब्ध नाही. तरी आपले संस्थेमार्फत सुसज्ज अंगणवाडी/बालवाडी सुरू केलेस त्याचा विद्यार्थ्यांच्या प्रगतीला निश्चितच फायदा होईल.

प्रत्येक वर्षी जून महिन्यामध्ये शासनामार्फत पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांना मोफत पुरविली जातात, परंतु लेखनासाठी वह्या सर्व मुलांना त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे घेता येणे शक्य होत नाही. तरी दोन्ही शाळांसाठी अंदाजे रू. ६०,००० च्या वह्या लेखनासाठी आवश्यक असतात.

वरीलप्रमाणे आपले संस्थेमार्फत शक्य ती मदत करावी. ही नम्रविनंती.

आपले कृपाभिलाषी

मुख्याध्यापिका
गिरीस्थान नगरपालिका शाळा नं. २ पाचगणी

मुख्याध्यापक
नगरपरिषद शाळा क्र.१ पांचगणी
ता.महाबळेश्वर पिन कोड ४१२८०५